**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०४ वे | दिनांक : ०८/०४/२०२६ | वार : बुधवार

## पार्थदादा खरे तेच बोललेत, काँग्रेसचा डाऊनफॉलच सुरू, मिटकरींकडून समर्थन





**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसवर केलेल्या टीकेचे परखड शब्दांत समर्थन केले आहे. पार्थदादा पवार यांचे विधान काँग्रेसला फारच झोंबले आहे. यामुळेच काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू सुरू असल्याच्या त्यांच्या विधानानंतर एरवी डबक्यात लपून बसलेली बेडके बाहेर पडून एकदम ड्न्याव ड्न्यावर करत आहेत, असे ते म्हणालेत.

पार्थ पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसवर निशाणा साधताना राज्यात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर सडकून टीका करत ते एक कृतघ्न मुलगा असल्याचा आरोप केला होता. विशेषतः शरद पवार, सुप्रिया सुळे व आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी पार्थ पवारांचे कान टोचले होते. यामुळे पार्थ पवार यांच्या राजकीय परिपक्वतेविषयी संशय व्यक्त केला जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी त्यांच्या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे.

अमोल मिटकरी यासंबंधी म्हणाले, पार्थदादा, u are absolutely right !.... आमच्या पक्षाचे नेते खासदार पार्थदादा पवार यांचं वक्तव्य काँग्रेसला फारच झोंबलेलं दिसतंय. काँग्रेसचा 'डाऊनफॉल' सुरू असल्याच्या पार्थदादांच्या वक्तव्यावर एरव्ही डबक्यात लपून बसलेली बेंडकं बाहेर पडत एकदम 'ड्न्याव-ड्न्याव' करत बोंबलायला लागलीत. कधीकाळी राज्यात सत्ताधारी असलेली काँग्रेस आज विधानसभेत 16 च्या आकड्यावर थांबलीय. 16 हा आकडा नेहमीच धोक्याचा असतो, असं जाणकारांना माहित आहे. त्यामुळेच पार्थ दादांनी असं वक्तव्य केलेलं असावं.मात्र, आपलं वर्तमान आणि अस्तित्व गमावलेल्या अन विसरलेल्या काँग्रेसला आता इतिहासाचाही अभ्यास करावा लागेल हे नक्कीच. पार्थदादा!, तुम्ही अगदी खरं बोललेत. काँग्रेसचा 'डाऊन फॉल'च सुरू आहे. जाहीर समर्थन, असे ते म्हणालेत.तत्पूर्वी, राष्ट्रवादीचे सरचिटणीस सूरज चव्हाण यांनीही या प्रकरणी काँग्रेसवर निशाणा साधला होता. ते म्हणाले होते, काँग्रेसने आमच्या नेत्यांवर टीका करण्यापेक्षा राहुल गांधी यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत काय केले ते अगोदर पाहावे. एखाद्या नेत्याच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबातील व्यक्ती पोटनिवडणूक लढवत असेल तर ती निवडणूक बिनविरोध करणे ही महाराष्ट्राची परंपरा आहे. पण काँग्रेसने ती परंपरा पाळली नाही. काँग्रेसने राजकीय परंपरेला छेद देण्याचे काम केले. बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी ही महाराष्ट्राची जनभावना आहे. पण या जनभावनेपासून दूर गेलेली काँग्रेस ही निवडणूक लढवण्यावर ठाम आहे.

काँग्रेसच्या या भूमिकेचा दाखला देत पार्थ पवारांनी काँग्रेसचे डाऊनफॉल सुरू होईल असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाला प्रत्युत्तर देताना त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका केली जात आहे. काँग्रेसने आमच्या नेत्यांवर पुन्हा अशी टीका केली तर त्याला जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल, असे ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याची टीका करणाऱ्या पार्थ पवारांचे कान टोचलेत. पार्थ पवार काँग्रेसच्या बाबतीत चुकले. असा कोणताही पक्ष संपत नसतो. या प्रकरणी नेहमी जमिनीवर राहणे महत्त्वाचे, असे ते म्हणालेत.

## ग्रामीण जनतेला मिळणार दर्जेदार आरोग्य सुविधा : "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव"



**मुंबई :** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना "आरोग्यसंपन्न गाव" म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना 65.25 कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

"माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राची गटलेवारची 'ॲमेझॉन'मध्ये ४५ लाखांच्या पॅकेजवर निवड



**छत्रपती संभाजीनगर :** येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (GECA) शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. संगणक शास्त्र व अभियांत्रिकी (CSE) विभागातील अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कुमारी प्राची गटलेवार हिची जगातील आघाडीची टेक कंपनी 'ॲमेझॉन' (Amazon) मध्ये वार्षिक 45 लाख रुपयांच्या भव्य पॅकेजवर निवड झाली आहे.

महाविद्यालयाची साथ आणि 'सेमिस्टर स्वॅप'चा निर्णय

प्राचीच्या या यशात तिची मेहनत आणि महाविद्यालयाने घेतलेल्या लवचिक निर्णयाचा मोठा वाटा आहे. सातव्या सत्रात असतानाच 'ॲमेझॉन'ने तिला सहा महिन्यांच्या इंटर्नशिपची ऑफर दिली होती. मात्र, महाविद्यालयाच्या नियमानुसार इंटर्नशिपची तरतूद आठव्या सत्रात असते. अशा वेळी प्राचीची ही सुवर्णसंधी हुकू नये म्हणून संगणक शास्त्र विभाग आणि विद्याशाखा परिषदेच्या (Academic Council) प्राधिकरणाने विशेष सकारात्मक पाऊल उचलले. तिला सातव्या सत्रात इंटर्नशिपला जाण्याची परवानगी देत 'सेमिस्टर स्वॅप'चा (सत्र अदलाबदल) पर्याय उपलब्ध करून दिला.

सर्वत्र कौतुकाचा वर्षाव

प्राचीच्या या उत्तुंग यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य डॉ. संजय डंभारे, संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विकुल पवार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर (TPO) डॉ. प्रवीण शेटिये, अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. अनिल करवणकर, शैक्षणिक कुलसचिव डॉ. एस. ए. सोनावणे, तसेच डॉ. श्रीवास्तव, डॉ. वाघ आणि प्रा. ए. बी. चौधरी. श्री शास्त्री यांनी तिचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि त्यांना जागतिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आमचे महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. प्राचीने मिळवलेले यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. - प्रशासन, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ एप्रिल २०२६


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळेत इयत्ता पहिलीसाठी प्रवेशोत्सव - एक पाऊल पुढे



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या उपक्रमांतर्गत मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा चिकलठाणा येथे प्रवेशोत्सव पहिले पाऊल व पालक मेळावा या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर व वसंत राठोड यांचे मार्गदर्शन नुसार करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पालक श्रीमती गायकवाड ताई होत्या, प्रमुख अतिथी शबाना शेख, बलराज इंगळे हे होते. कार्यक्रमाची पूर्वतयारी श्री सूर्यवंशी सर, सासवडे मॅडम, कवठेकर मॅडम, विशाखा मॅडम यांनी केली. फलक लेखन श्रीमती भिंगोले मॅडम, फुलंब्रीकर मॅडम यांनी केले.

रांगोळी श्रीमती शिंदे मॅडम व नववीच्या विद्यार्थिनींनी काढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मालोदे मॅडम यांनी केले. तर आभार श्रीमती भारद्वाज मॅडम यांनी केले. श्रीमती रंधे मॅडम यांनी प्रवेशाची नोंदणी केली.

सदरील कार्यक्रमाचे सर्व व्यवस्थापन श्री. राठोड सर, मडके सर, वाघ सर, चव्हाण सर, पठाण सर यांनी उत्तमरीत्या केले. यासाठी भोसले मावशी व साबळे मावशी यांचे योगदान लाभले

## राज्य कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन १० एप्रिल पूर्वी करा - प्रा. पवार



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपूर्वी दि.१० एप्रिल पर्यंत प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे मासिक वेतन देण्यात यावे, अशी मागणी मुक्ता संघटनेचे जालना जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.समाधान पवार यांनी केली आहे. बऱ्याचदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती नंतर मार्च महिन्याचं मासिक वेतन होत असते यामुळे राज्य कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा उत्सव, सण सर्वांना साजरा करता येत नाही, यावर्षी राज्य शासनाने याची गंभीर दखल घेऊन संपूर्ण राज्य कर्मचाऱ्यांचे वेतन दि. १४ एप्रिल पूर्वी करावे असेही प्रा. पवार यांनी म्हटले आहे.

## "मायबाप" कवितासंग्रहाचे फ. मु. शिंदे व लिला शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या १५व्या पुस्तकाचे प्रकाशन छत्रपती सभाजीनगर येथील शिंदे यांच्या निवासस्थानी छोट्याखानी कार्यक्रमात सहा एप्रील सोमवारी कविवर्य प्रा. फ. मु. शिंदे व प्रख्यात बालसाहित्यिक प्रा. लिला शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी फ. मु. शिंदे म्हणाले, "संघर्षाचे आधिष्ठाण असल्याशिवाय दर्जेदार साहित्याची निर्मितीच होत नाही. अय्युब पठाण सारख्या ग्रामीण कवीने आई- वडीलांवर लेखन करून मायबापचे आशिर्वाद प्राप्त केलेले आहे." यांप्रसंगी कवी हबीब भंडारे, प्रकाशक, राजीव चौतमल, कवी संजय खाडे, शेख जाहेद हुसेन, सलमान शेख, जफरखाँ पठाण यांची प्रकाशन सोहळ्याला विशेष उपस्थिती होती.

## महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिनव उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** सध्याच्या काळातील तरुण हा पुस्तकांपासुन दुर होत चालला आहे.याचा दुष्परिणाम म्हणजे युवा पिढीला स्वतःचा असा कुठलाही विचार राहीला नाही.स्वतःचे वैचारिक स्वातंत्र्य देखील आज ते गमावत आहे.याचे कारण म्हणजे ते वाचन संस्कृती पासुन दूर जाणे होय. ज्यांनी पुस्तकांना आपला मित्र बनवलं त्यांच्या मध्ये परिस्थिती बदलण्याची धमक निर्माण केली आणि याचं महान उदाहरण म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे. म्हणून पुस्तक मित्र बाबासाहेबांची जयंती देखील त्यांच्या विचारांना अभिप्रेत अशी झाली पाहिजे. याच संकल्पनेतून मागील ३ वर्षांपासून महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन च्या माध्यमातून मानसशास्त्रज्ञ प्रा. सागर चाबुकस्वार यांनी बुक डोनेशन ड्राईव्ह बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त आयोजित करत आहेत. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तक मिळत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड आहे. परंतू, पुस्तक वाचायला भेटत नाहीत. अशा विद्यार्थ्यांना या उपक्रमांमुळे त्यांच्या ज्ञानात भर पडत आहे. तरी आपण किमान एक तरी पुस्तक दान करावे असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

**पुस्तक दान करण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा -९०२८११९११८ / ९५११८४०५२० /७२७६८४१३१३ / ९७६४१७७३४९ / ८७९६६२२००९.**

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयडियाथॉन २०२६ स्पर्धेत ४८ युवकांच्या नवीन आयडिया सादर





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे इनकुबेशन सेंटर फॉर अत्रप्रीनर , करिअर कट्टा आणि ENSIN फोरम पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयडियाथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या आयडियाथॉन आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धेला महाराष्ट्र तसेच कर्नाटक मधून 48 युवक, विद्यार्थी, संशोधक यांनी सहभाग घेऊन आपल्या नवनवीन आयडिया चे सादरीकरण केले. संशोधनवृत्ती, नवोपक्रमशीलता, सर्जनशील विचार आणि प्रभावी सादरीकरण कौशल्याला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत एकूण २८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. विविध सामाजिक, शैक्षणिक, तांत्रिक आणि संशोधनाधिष्ठित विषयांवरील कल्पक संकल्पना विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे सादर केल्या.स्पर्धेचे परीक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसर धाराशिव येथील मॅनेजमेंट सायन्स विभागातील प्रा. डॉ. विक्रम शिंदे आणि डॉ. प्रा. सचिन बसैया तसेच संजय जगताप यांनी केले. नाविन्यता, मांडणी, सामाजिक उपयुक्तता, संशोधनाधिष्ठित दृष्टी आणि सादरीकरण या निकषांवर स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले. स्पर्धेत प्रथम पारितोषिक चव्हाण जगदीश यांनी पटकावले. त्यांना रु. १,१९९ रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय पारितोषिक विभागून माने साक्षी आणि जाधव मनस्वी तसेच योगेश मुगळे यांना प्रत्येकी रु. ४९९ रोख पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तृतीय पारितोषिक चव्हाण आर. बी. यांनी मिळविले. त्यांना रु. ७९९ रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले.तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक मुरुगेंद्र वाली यांना रु. ४९९ रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी सर्व युवक विद्यार्थ्यां मधून "यंग स्टुडंट आयडिया अवॉर्ड" कु. प्रियंका इंगळे यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह, तर संशोधक विद्यार्थ्यां मधून "रिसर्च स्कॉलर इनोव्हेशन आयडिया अवॉर्ड" विजापूर येथील इराण्णा जबा यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.बक्षिस वितरण कार्यक्रम अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास इंगळे होते. त्यानी अध्यक्षीय समारोपात बोलताना या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले विचार, संशोधनाधिष्ठित संकल्पना आणि नवकल्पना मांडण्याचे प्रभावी व्यासपीठ मिळाले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संशोधनाभिमुखता आणि उद्योजकतेची प्रेरणा निर्माण होते, असे मत व्यक्त केले.स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे तसेच मा. संजय जगताप यांच्या हस्ते रोख रक्कम आणि प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिअर कट्टा चे समन्वयक डॉ एस पी पसरकल्ले, आणि प्रास्ताविक डॉ सी. डी करे यानी तर आभार प्रदर्शन डॉ एस टी. तोडकर यानी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६


## बेरडवाडीत पतीने केली पत्नी आणि आठ वर्षाच्या चिमुकलीची कुऱ्हाडीने हत्या






**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील बेरडवाडी (भुसणी) येथे एका निर्दयी पतीने आपल्या पत्नीची आणि आठ वर्षाच्या निरागस मुलीची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (ता.7) रोजी पहाटे उघडकीस आली. या भीषण घटनेने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सोमवारी रात्री उशीरा घरात पती, पत्नीचे भांडण झाले असावे, त्यातून दुहेरी हत्याकांड झाले. परंतू यामागे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. दरम्यान वडिलांचे रौद्र रूप पाहून मुलगा घराबाहेर पळून गेल्याने तो वाचला आहे. पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास आरोपी अजित अपन्ना वासुदेव हा स्वतः मुरूम पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने पोलिसांसमोर कुऱ्हाडीने वार करून पत्नी लिंबूबाई व मुलगी मानसी यांचा खून केल्याची कबुली दिली. स्वतःच्या पत्नीचा आणि पोटच्या मुलीचा त्याने काटा काढल्याचे ऐकताच पोलीसही चक्रावून गेले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, मुरूम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. संदीपान दहिफळे यांनी तातडीने फौजफाट्यासह बेरडवाडी गाठले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले आणि उत्तरीय तपासणीसाठी मुरूम ग्रामीण रुग्णालयात पाठवून दिले.या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार यांनी मुरूम पोलीस ठाण्याला भेट देऊन तपासाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. दरम्यान या प्रकरणी नागनाथ शेंमले (रा. वाडी कासारशिरशी, ता. निलंगा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुरूम पोलीस ठाण्यात आरोपी अजित अपन्ना वासुदेव याच्यावर भादंवि कलम 302 (खून) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास मुरूम पोलीस करत आहेत.






## डिजिटल शिक्षणाचा भूलभुलैया : मुलांच्या बौद्धिक विकासावर होतोय 'स्लो पॉयझनिंग'चा मारा




**शिक्षण** क्षेत्रात क्रांतीच्या नावाखाली आपण ज्या 'डिजिटलायझेशन'चे स्वागत केले, ते आता एका गंभीर वळणावर येऊन ठेपले आहे. एकेकाळी दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी 'टॅबलेट' हा उत्तम पर्याय वाटत होता, पण आज तोच टॅबलेट मुलांच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेच्या आड येत असल्याचे स्पष्ट होत आहे. जगभरातील प्रतिष्ठित विद्यापीठांचे संशोधक आता ओरडून सांगत आहेत की, शिक्षणातील अति-डिजिटलायझेशन हे मुलांच्या मेंदूसाठी 'स्लो पॉयझनिंग' ठरत आहे.शिक्षण आणि वाचन संस्कृतीत तंत्रज्ञानाने दिलेले सर्वात मोठे आमिष म्हणजे 'सुविधा'. हजारो पुस्तके एका छोट्याशा उपकरणात मावतात, या मोहापायी आपण कागदाकडून स्क्रीनकडे वळलो. आजकाल वाचनासाठी 'किंडल' (Kindle) सारख्या ई-रीडर्सचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. "पुस्तके वाचली काय किंवा किंडलवर वाचली काय, शेवटी वाचणे महत्त्वाचे," असा युक्तिवाद केला जातो. मात्र, न्यूरोसायन्स आणि शैक्षणिक मानसशास्त्र याकडे वेगळ्या नजरेने पाहत आहे. 'किंडल' विरुद्ध 'कागद': मेंदूला काय भावते?किंडलमध्ये 'ई-इंक' (E-ink) तंत्रज्ञान असल्याने डोळ्यांना त्रास कमी होतो हे खरे असले, तरी मेंदूसाठी ते कागदाची जागा घेऊ शकत नाही. जेव्हा आपण प्रत्यक्ष पुस्तक वाचतो, तेव्हा आपले मेंदू एका 'भौगोलिक नकाशा' (Topographical Map) प्रमाणे माहिती साठवतो. डाव्या पानावर खाली काय लिहिले होते किंवा उजव्या पानावर मधोमध कोणते महत्त्वाचे वाक्य होते, याची एक अदृश्य प्रतिमा मेंदूत तयार होते. किंडलवर 'स्क्रोल' करताना किंवा पाने 'फ्लिप' करताना हा नकाशा तयार होत नाही. परिणामी, वाचलेली माहिती दीर्घकाळ स्मरणात राहत नाही. तंत्रज्ञानाच्या निर्मात्यांची 'सावधगिरी'सर्वात मोठा विरोधाभास हा आहे की, ज्यांनी जगाला आयपॅड आणि लॅपटॉप दिले, त्या 'सिलिकॉन व्हॅली'मधील टेक-दिग्गजांनी (उदा. स्टीव्ह जॉब्स, बिल गेट्स) आपल्या मुलांना सुरुवातीच्या काळात तंत्रज्ञानापासून लांब ठेवले होते. तेथील 'वॉल्डोर्फ' सारख्या शाळांमध्ये आजही संगणकाला प्रवेश नाही; तिथे मातीकाम, विणकाम आणि कागदावरचे लेखन यावर भर दिला जातो. जर तंत्रज्ञानाचे 'गॉडफादर' आपल्या पाल्यांसाठी स्क्रीन नाकारत असतील, तर आपण कोणत्या दिशेने जात आहोत?मेंदूची जडणघडण आणि 'हस्ताक्षर'न्यूरोसायन्सच्या मते, जेव्हा बाळ किंवा विद्यार्थी हाताने लिहितो, तेव्हा त्याच्या मेंदूच्या डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही भागांमधील पेशी कार्यान्वित होतात. पेन किंवा पेन्सिलने कागदावर अक्षर गिरवताना हाताच्या बोटांच्या हालचालीतून मेंदूला विशिष्ट सिग्नल जातात, ज्याला 'हॅप्टिक परसेप्शन' म्हणतात. कीबोर्डवर बटणे दाबल्याने ही प्रक्रिया घडत नाही. परिणामी, डिजिटल माध्यमांवर शिकणाऱ्या मुलांची 'क्रिटिकल थिंकिंग' (चिकीत्सक विचार) करण्याची क्षमता कमी होत चालली आहे.'सखोल वाचन' विरुद्ध 'वरवरची माहिती'पुस्तकातील मजकूर वाचताना आपण एका पानावरून दुसऱ्या पानावर जाताना एक मानसिक नकाशा (Mental Map) तयार करतो. यामुळे वाचलेली माहिती दीर्घकाळ लक्षात राहते. याउलट, स्क्रीनवर 'स्क्रोल' करताना मेंदूला कोणताही स्थिर बिंदू मिळत नाही. एका संशोधनानुसार, स्क्रीनवर वाचणारी मुले केवळ महत्त्वाचे शब्द 'स्कॅन' करतात, ज्यामुळे त्यांना विषयाचे आकलन होत नाही, तर केवळ माहिती मिळते. माहिती आणि ज्ञान यातील हा फरक मिटत चालल्याने भविष्यातील संशोधक वृत्ती धोक्यात आली आहे.भावनिक बुद्धिमत्तेचा ऱ्हासशिक्षण म्हणजे केवळ पाठांतर नव्हे, तर तो एक सामाजिक संवाद आहे. वर्गात शिक्षकांचे हावभाव, त्यांचे बोलण्यातील चढ-उतार आणि सहकाऱ्यांशी होणारी चर्चा यातून मुलांची 'इमोशनल इंटेलिजन्स' (भावनिक बुद्धिमत्ता) विकसित होते. ई-लर्निंग किंवा स्क्रीनवर आधारित शिक्षणामुळे हा मानवी संवाद तुटला आहे. मुले यंत्राशी संवाद साधू लागली आहेत, ज्यामुळे त्यांच्यात सामाजिक एकटेपणा आणि संवाद कौशल्याचा अभाव निर्माण होत आहे.आरोग्याचा उडणारा 'भडका'केवळ डोळ्यांचे विकारच नव्हे, तर 'डिजिटल डिमेंशिया' नावाचा एक नवा आजार समोर येत आहे. सततच्या स्क्रीन वापरामुळे मुलांची स्मरणशक्ती कमकुवत होणे, एकाग्रता भंग पावणे आणि चिडचिडेपणा वाढणे ही त्याची लक्षणे आहेत. रात्री उशिरापर्यंत स्क्रीनचा वापर केल्याने शरीरातील 'मेलाटोनिन' हार्मोनची निर्मिती थांबते, ज्यामुळे झोपेचे चक्र बिघडून मुलांच्या शारीरिक वाढीवरही परिणाम होत आहे.* भारतापुढील पेचप्रसंगभारतात आपण 'डिजिटल इंडिया' अंतर्गत शाळा स्मार्ट करण्यावर भर देत आहोत, ही अभिमानाची गोष्ट आहे. पण, हे करताना आपण 'साधन' (Tool) आणि 'साध्य' (Goal) यामध्ये गल्लत करत आहोत. तंत्रज्ञान हे शिक्षणाला पूरक असावे, ते शिक्षणाचे केंद्रस्थान बनू नये. विशेषतः प्राथमिक शिक्षणात (पहिली ते आठवी) कागद, पेन आणि प्रत्यक्ष शिक्षकाचा संवाद यांचा कोणताही पर्याय असू शकत नाही.निष्कर्ष आणि उपाययोजना:वेळ अद्याप गेलेली नाही. आपल्याला 'हायब्रिड मॉडेल'चा स्वीकार करावा लागेल: * नियमन: शाळेत आणि घरी मुलांचा 'स्क्रीन टाईम' अत्यंत मर्यादित असावा. * पुस्तकांचे पुनरागमन: लायब्ररी संस्कृती पुन्हा जिवंत करून मुलांना हातात पुस्तक घेऊन वाचण्याची गोडी लावावी लागेल.

लेखनाचा सराव: दररोज किमान दोन पाने हाताने लिहिणे अनिवार्य करावे.शेवटी, भविष्य हे तंत्रज्ञानाचे असेलच, पण ते चालवण्यासाठी लागणारी 'बुद्धी' जर यंत्रावर अवलंबून राहिलो, तर माणूस केवळ यंत्राचा गुलाम बनेल. आपल्या मुलांना 'स्मार्ट' बनवण्याच्या नादात आपण त्यांना 'यंत्रवत' बनवू नये, हीच काळाची गरज आहे.




**श्रीमती सरला शामराव कामे**
राज्य आदर्श शिक्षिका
(M.A.M.ed)

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ एप्रिल २०२६

# जागतिक आरोग्य दिन विशेष : "निरोगी शरीर, निरोगी समाज

**द**रवर्षी ७ एप्रिल हा दिवस जगभरात जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे आयोजन जागतिक आरोग्य संघटना (WHO) करते. १९४८ मध्ये WHO ची स्थापना झाली आणि त्याच दिवशी, म्हणजे ७ एप्रिलला, हा दिवस आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो.आजच्या धकाधकीच्या आणि बदलत्या जीवनशैलीत आरोग्य हा विषय अधिक महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळे जागतिक आरोग्य दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून स्वतःच्या आरोग्याकडे पाहण्याचा आणि समाजाला आरोग्याबाबत जागरूक करण्याचा एक महत्त्वाचा दिवस आहे.आरोग्य म्हणजे काय ?आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णतः निरोगी असणे होय. आजच्या काळात अनेक लोक शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त दिसतात, पण मानसिक ताण, चिंता आणि अस्वस्थता यामुळे खऱ्या अर्थाने निरोगी नसतात.आजच्या काळातील आरोग्यविषयक आव्हानेआधुनिक जीवनशैलीमुळे अनेक आरोग्य समस्या वाढताना दिसत आहेत.१. जीवनशैलीशी संबंधित आजार* मधुमेह (Diabetes)* उच्च रक्तदाब (BP)* हृदयरोग* लठ्ठपणाहे आजार प्रामुख्याने चुकीच्या आहारामुळे आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे वाढतात.२. मानसिक आरोग्याचा प्रश्नआजच्या स्पर्धात्मक युगात ताण, नैराश्य, चिंता यांसारख्या समस्या वाढत आहेत. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास त्याचा परिणाम संपूर्ण जीवनावर होतो.३. संसर्गजन्य आजारकोरोनासारख्या महामारीनंतर आरोग्याची जाणीव अधिक वाढली आहे. स्वच्छता आणि सुरक्षिततेचे महत्त्व सर्वांना समजले आहे.आरोग्य राखण्यासाठी आवश्यक उपाय१. संतुलित आहारताजे फळे, भाज्या, प्रथिनेयुक्त अन्न आणि पुरेसे पाणी घेणे आवश्यक आहे. जंक फूड आणि तळलेले पदार्थ टाळणे गरजेचे आहे.२. नियमित व्यायामदररोज किमान ३० मिनिटे चालणे, योगा किंवा व्यायाम करणे आवश्यक आहे. यामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि रोगांपासून बचाव होतो.३. मानसिक आरोग्याची काळजीध्यान, योग, सकारात्मक विचार आणि पुरेशी झोप यामुळे मानसिक आरोग्य सुधारते.४. स्वच्छता आणि आरोग्य सवयीहात स्वच्छ धुणे, स्वच्छ पाणी पिणे आणि स्वच्छ परिसर राखणे हे आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.५. नियमित आरोग्य तपासणीलहानसहान लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक आहे.समाज आणि शासनाची भूमिकाआरोग्य ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही, तर समाज आणि शासनाचीही मोठी जबाबदारी आहे.* शासकीय आरोग्य सेवा सुधारणा* ग्रामीण भागात आरोग्य सुविधा उपलब्ध करणेजनजागृती कार्यक्रम राबवणे* पोषण आणि स्वच्छतेबाबत मोहिमायामुळे समाजाचे एकूण आरोग्य सुधारू शकते.जागतिक आरोग्य दिनाचे महत्त्वजागतिक आरोग्य दिन आपल्याला आठवण करून देतो की, "आरोग्य हेच खरे धन आहे."जीवनात पैसा, यश आणि प्रसिद्धी मिळवताना आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करतो, पण आरोग्य चांगले नसेल तर बाकी सर्व गोष्टी निरर्थक ठरतात.

निष्कर्ष - आजच्या वेगवान जीवनात निरोगी राहणे ही मोठी गरज बनली आहे. योग्य आहार, व्यायाम, मानसिक संतुलन आणि स्वच्छता या सवयी अंगीकारल्यास आपण निरोगी जीवन जगू शकतो.जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारून "निरोगी व्यक्ती, निरोगी कुटुंब आणि निरोगी समाज" घडवण्याचा संकल्प करणे हीच खरी गरज आहे.



**भगवंत पाळवदे,**
अंबाजोगाई :
सामाजिक कार्यकर्ता

## उभा आहे मी..

असे अनेक डोंगरं
उचलत आलोय मी
खांद्याना झेपणारे न झेपणारे..

आता राहिलो उभा
पण वाकलेय खांदे
जबाबदारीच्या असह्य ओझ्याने
पण मोडलो नाही
मुळं खोल खोल गेल्याने..

काळ्या पाषाणावर तरलेल्या
दुष्काळाने मढलेल्या
वाळवंटी जिंदगीत
आलीय रोज वादळे
पाचवीला पुजलेली असल्याने..

पण लढत गेलो मी
वादळवाऱ्यांशी
हिमालयापरी एकटाच..

या उन्हाने होरपळलेल्या काळात
उभा आहे कुरुक्षेत्रावर
स्वतःचा अभिमन्यु न होऊ देता
जिंकण्यासाठी..
सोबतीला कृष्ण नसतानाही..



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## युगनायकास

युगनायका ऽऽ,
तुझ्या प्रखर प्रेरणेने
आकाशात
संघर्षाच्या विजा
कडाडल्या तेव्हा
या वांझ भूमीत
मानवतेचा पाऊस
पडला
तुझ्या तेजस्वी
विचारांनी एक
नवा इतिहास घडला !
युगनिर्मात्या तू ऽऽ
उःशापाच्या
घन अंधारात
आत्मबलाने
चकाकणारा
प्रखर सूर्य !
तुझे तेजस्वी
स्मरण म्हणजे
उपेक्षित भारताचे
अपेक्षित धैर्य !!

हे युगपुरूषा
मी तुझ्या प्रगल्भ
व्यक्तिमत्वात
वादळांचा सूर्य पाहतो
पीडितांच्या आभाळ - यातनांसाठी
दिलासा देणारे धैर्य पाहतो
इथल्या मस्तवाल , मुजोर
दंभाची रग ठेचून काढणारे
सळसळणारे शौर्य पाहतो !

**- डी.बी.जगत्पुरिया**
'संगर' पाण्याच्या टाकीजवळ,
मीरा नगर, पडेगाव, संभाजीनगर
मो. ९८६०४८५३९८

# वरनाळवाडी येथे गोठ्याला आग लागून लाखोंचे नुकसान...





**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : तालुक्यातील वरनाळवाडी येथील एका शेतकऱ्याच्या गाईच्या गोठ्याला अज्ञात व्यक्तीने जाळ लावल्याने यामध्ये शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाल्याची घटना सोमवारी (ता. सहा) रोजी घडली. दरम्यान आलूर जिल्हा परिषदचे नवनिर्वाचित सदस्य आप्पासाहेब पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन आगीत सर्वच उध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला मदतीचा हात पुढे करत आर्थिक मदत केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वनारळवाडी येथील शेतकरी रफिक साहेबलाल बाग यांच्या गट नं. २५५ मधील शेतातील जनावरांच्या गोठ्याला अज्ञाताने आग लावल्याने या भीषण आगीत शेतकरी बाग यांचे गीर गाय, बैलगाडी व पेरणी साहित्य,१५ पोते तूर, १५ पोते हरभरा, ज्वारी, ३ विद्युत मोटार, मोटारीचे केबल, १००० कडबा, डिझेल इंजिन १, ताडपत्री ३, पाईप सेट ३०, तुरीचे भुसा जळून खाक झाले. अचानक लागलेल्या आगीत बाग कुटुंबीयांचे अंदाजे अडीच ते तीन लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने हे कुटुंब पूर्णपणे कोलमडून गेले होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच आलूर जिल्हा परिषद गटाचे सदस्य आप्पासाहेब पाटील यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन मदतीचा हात पुढे केला. संकटात सापडलेल्या बाग कुटुंबीयांचे सांत्वन करत आप्पासाहेब पाटील यांनी केवळ शब्द दिले नाहीत, तर तातडीची गरज म्हणून त्यांनी बाग कुटुंबीयांना वैयक्तिक स्वरूपात आर्थिक मदत केली. तसेच आगीमुळे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून प्रशासनाकडून जास्तीत-जास्त शासकीय मदत मिळवून देण्यासाठी आपण स्वतः कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. संकट मोठे असले तरी खचून जाऊ नका, आम्ही तुमच्या सोबत आहोत, अशा शब्दांत त्यांनी कुटुंबाला धीर दिला. या घटनेची शेतकऱ्याने मुरूम पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तिगृह तक्रार दाखल केली आहे. दरम्यान संकट काळात आप्पासाहेब पाटील यांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता आमच्यासाठी खूप मोलाची आहे, असे यावेळी ग्रामस्थांनी सांगून आप्पासाहेब पाटील यांचे आभार व्यक्त केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६


## समृद्धी महामार्गावर टँकरमधून गॅस गळती



**हिंगोली :** गतिमान प्रवासासाठी हाती घेण्यात आलेला समृद्धी महामार्ग आता प्रवाशांसाठी चांगलाच अडचणीचा ठरू लागला आहे. मंगळवारी तारीख ७ तब्बल २५ किलोमीटरचा जाम लागल्यामुळे हजारो वाहने अडकून पडली आहेत. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असताना महामार्ग पोलिसांकडून मात्र हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवले जात आहे.

नागपूर ते मुंबई असा समृद्धी महामार्ग मागील दीड ते दोन वर्षात खुला करण्यात आला आहे. या मार्गावरून वाहनांचा गतिमान प्रवास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र या मार्गावरून वाहतूक गतिमान होणे ऐवजी वारंवार वाहतूक ठप्प होण्याची प्रकार होऊ लागले आहेत. या समृद्धी महामार्गावर अपघात नित्याचे झाले असून अनेकांना जीव गमवावे लागले आहे. दोन दिवसांपूर्वीच या महामार्गावर सात मजुरांचा बळी गेला. त्यानंतरही या महामार्गाच्या वाहतुकीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.

मंगळवारी (ता. 7) या महामार्गावर जालना एक्झिट च्या पुढे काही अंतरावर टँकर मधून गॅस लिकेज होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. दुपारपासून सुमारे २५ किलोमीटर अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. हजारो वाहने अडकून पडली आहेत. विशेष म्हणजे काही वाहने जालना एक्झिट जवळ असताना कार सारख्या छोट्या वाहनांना जालना एक्झिट वरून खाली उतरण्यासाठी रस्ता मोकळा करावा अशी मागणी प्रवाशांनी महामार्ग पोलिसांकडे केली. मात्र पोलिसांकडून कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नसल्याने प्रवाशांमधून संतापाची भावना व्यक्त होऊ लागली आहे.

या संदर्भात काही प्रवाशांनी समृद्धी महामार्गाच्या नियंत्रण पथकाशी संपर्क साधला असता त्यांनी मात्र महामार्ग सुरू असल्याचे सांगत अज्ञान प्रगट केले. मात्र प्रत्यक्षात २५ ते ३० किलोमीटर अंतरापर्यंतच्या वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महामार्गाच्या नियंत्रण विभागाच्या या अज्ञानावरही प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. या महामार्गावरून पोलिसांसोबतच उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची वाहने धावत असल्यामुळे आता महामार्ग खुला होईल अशी अपेक्षा व्यक्त होऊ लागली. मात्र उपप्रादेशिक परिवहन विभाग देखील या जाम पासून अनभिज्ञ असल्याचे दिसून आले.

प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच गतिमान प्रवासासाठी सुरू केलेला समृद्धी महामार्ग प्रवाशांसाठी मात्र चांगलाच अडचणीचा ठरू लागला आहे. या महामार्गावरील कर्मचाऱ्यांच्या मूग गिळून गप्प बसण्याच्या भूमिकेमुळे प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या संदर्भात काही प्रवाशांनी पोलिसांची संपर्क साधला. पण त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. परिणामी, वाहतूक सुरू करण्यासंदर्भात कुठल्याही संदर्भातील हालचाली सुरू नसल्याने प्रवाशांचा उद्रेक होण्याची शक्यता दिसून येत आहे.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला उद्योगविश्वाचा प्रत्यक्ष अनुभव




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एमआयडीसीतील कालिका स्टील इंडस्ट्रीज येथे प्रकल्प भेट देत उद्योगक्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.जालना: बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून एमआयडीसी परिसरातील कालिका स्टील इंडस्ट्रीज या उद्योगाला प्रकल्प भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया आणि व्यवस्थापन प्रणाली याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना लोखंड निर्मितीसाठी लागणारे मूलभूत घटक, तसेच लोखंडी सळ्यांच्या उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने समजावून सांगण्यात आली. उत्पादनाची निर्मिती, त्याचे वितरण व्यवस्थापन आणि उद्योगात वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानातील बदल याबाबतही माहिती देण्यात आली. अतुल परमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कारखान्याची आंतरिक रचना, व्यवस्थापन प्रणाली आणि तांत्रिक बाबी विद्यार्थ्यांना सुस्पष्टपणे समजावून दिल्या.या प्रकल्प भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रकल्प संकल्पना, त्याची अंमलबजावणीची प्रक्रिया आणि उद्योगाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत होणारे योगदान याविषयी प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळाले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्नांवर चर्चा करून सैद्धांतिक ज्ञानाला व्यावहारिक आधार मिळवला.उद्योजक श्री. अरुणजी अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उद्योग, व्यवसाय आणि राष्ट्रीय विकास याविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले. ते म्हणाले, कालिका स्टील ही कंपनी कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे. उत्पादन प्रक्रियेत स्क्रॅप आणि प्रत्यक्ष कमी केलेल्या लोहाचा वापर केल्यामुळे नैसर्गिक खनिज संसाधनांवरील अवलंबित्व कमी होते तसेच पारंपरिक उत्पादन पद्धतींच्या तुलनेत कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट होते. याशिवाय, ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान आणि प्रगत प्रक्रिया सुधारणा यांचा अवलंब करून कंपनी आपल्या कार्बन फूटप्रिंटवर नियंत्रण ठेवते. तसेच, ज्वलन प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे प्रदूषक नियंत्रित करण्यासाठी अत्याधुनिक धूळ एकत्रीकरण व्यवस्था बसवण्यात आली असून, प्रदूषण प्रभावीपणे कमी केले जाते. या सर्व उपाययोजनांमुळे कालिका स्टील कंपनी 'हरित पोलाद' उत्पादनाच्या दिशेने वाटचाल करत असून पर्यावरण संरक्षणासाठी आपली दृढ बांधिलकी दर्शवते.या निमित्ताने उद्योग विश्वातील अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि व्यावहारिक अनुभव अधिक समृद्ध झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे आणि माजी प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रकल्प भेटीत प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. डॉ. क्षमा अनभुले, प्रा. डॉ. सुनीता भराडे आणि प्रा. स्मिता निर्मल यांची उपस्थिती होती. या प्रसंगी प्रा. डॉ. उद्धव थोरवे यांनी कालिका उद्योग समूहाच्या व्यवस्थापनाचे आभार मानले.

## खरातला गुन्ह्यांसाठी मदत करणाऱ्यांवर कारवाई होणार - तेजस्वी सातपुते



**नाशिक :** राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाचा तपास आता अंतिम टप्प्याकडे सरकत आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (SIT) व्याप्ती वाढवण्यात आली असून, एकूण २४ अनुभवी पोलीस अधिकारी आणि अंमलदारांचे पथक अहोरात्र काम करत असल्याची माहिती एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी खरातच्या अघोरी कृत्यांचा पाढा वाचतानाच, पीडित महिलांच्या गोपनीयतेबाबत अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले. तसेच जसे तपासात पुरावे समोर येतील, तसे अशोक खरातला गुन्ह्यांसाठी मदत करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तेजस्वी सातपुते यांनी दिलेल्या माहितीनुसार, या विशेष तपास पथकामध्ये २ पोलीस उपअधीक्षक, ३ पोलीस निरीक्षक, ३ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १० पोलीस उपनिरीक्षक आणि ६ पोलीस अंमलदार अशा एकूण २४ जणांचा समावेश आहे. हे पथक तांत्रिक पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे खरातच्या गुन्ह्यांचे जाळे उलगडत आहे.

अशोक खरात याच्यावर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत मिळून एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ११ गुन्ह्यांचा तपास थेट एसआयटीमार्फत केला जात आहे. यामध्ये ८ गुन्हे हे महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे असून उर्वरित ३ गुन्हे आर्थिक फसवणूक, जादूटोणा विरोधी कायदा आणि अवैध सावकारी अधिनियमांतर्गत नोंदवण्यात आले आहेत. इतर तीन गुन्ह्यांचा तपास स्थानिक पोलीस करत आहेत.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |